महाराष्ट्र टाइम्स
मुंबई ■ २९ सप्टेंबर २०१०

# विद्यार्थ्यांसाठी इग्लिजिअस

ठाकूर इन्स्टिट्यूटचा उपक्रम

म. टा. प्रतिनीधी

कांदिवलीच्या ठाकूर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्चतर्फे विद्यार्थ्यांच्या उद्यमशीलतेला वाव देण्यासाठी एग्लिजिअस हा आगळावेगळा उपक्रम राबवण्यात येत आहे.

कॉलेजच्या सृजन या कार्यक्रमाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या एग्लिजिअस या उपक्रमात केवळ अंड्यापासून तयार करण्यात आलेल्या आरोग्यवर्धक, स्वादिष्ट रेसिपी कॉलेज कॅम्पसमधून पुरविल्या जाणार आहेत. कॉलेजच्या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील उद्यमशीलतेला वाव मिळेल, असा विश्वास संचालिका डॉ. मृणालिनी काहोजकर यांनी व्यक्त केला. एग्लिजिअसच्या टीममध्ये सुधाकर यादव, कॅरोलीन ख्रिस्टीन, आशीष कोठारी आणि सौरभ म्हात्रे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. याचबरोबर माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी ई-क्लब आणि ई-क्लिनिक हे नवीन उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

Pg-05